| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.<br>करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रकाचे स्वरुप | संपूर्ण मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरणा करणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करात सवलत देणेबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/३२८ /२०२२, दिनांक: २० / १०/२०२२ |
| विषय : | चालू आर्थिक वर्षात नवीन आकारणी होणाऱ्या मालमत्ताना सामान्य करात सवलत देणेबाबत |
| कोणाच्या माहिती / कार्यवाहीसाठी | मालमत्ता कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | १.कर व करेत्तर बाबींचे दरपत्रक सन २०२२-२०२३<br>२.परिपत्रक क्र.कर/मुख्य/६/कावि/ ४७०/२०११,दिनांक ०३/०८/२०११<br>३.परिपत्रक क्र.कर/मुख्य/९/कावि/ १५९ /२०२२,दिनांक ०१/०६/२०२२<br>४.मा.प्रशासक यांचेकडील मा. महापालिका ठराव क्रमांक १८८ दि. ०४/१०/२०२२ |

परिपत्रक,

करआकारणी व करसंकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७, १२८ व १२९ मधील तरतुदीनुसार मालमत्ताकराची आकारणी व वसुली करणेत येते. तसेच नियम ३० अन्वये मालमत्ता कर ०१ एप्रिल व ०१ ऑक्टोबर रोजी सुरु होणा-या सहामाही हस्याने आगाऊ देय आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४०अ मधील तरतुदीनुसार दिनांक ०१ एप्रिल रोजी मालमत्ता कर नोंद आकारणी रजिस्टरला नोंद असलेल्या मालमत्तांधारकांना मालमत्ता कराचे आर्थिक वर्षाचे दोन्ही सहामाहीचे संपूर्ण बिलांची रक्कम ३० जून पूर्वी आगाऊ भरणा केल्यास संदर्भीय २ व ३अन्वये खालीलप्रमाणे चालू आर्थिक वर्षाचे मागणीतील सामान्य करात सवलत लागू आहे.

| आगाऊ मालमत्ता कर भरणारे मालमत्ताधारक | चालू आर्थिक वर्षाचे मागणीतील सामान्य करात सवलत | |
|---|---|---|
| | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ पासून |
| स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मालमत्तेस | १०% | ५% |
| बिगरनिवासी / मिश्र/ औद्योगिक / मोकळया जमिनी इत्यादी मालमत्तेस | ५% | ५% |

तथापि मालमत्ताकराचे आकारणी रजिस्टरला नोंद नसलेल्या व चालू आर्थिक वर्षात दिनांक १ एप्रिल नंतर आकारणी होणाऱ्या नवीन मालमत्ताना प्रथम आकारणी करणेत आल्यास अशा मालमत्तांना त्यांची त्यापूर्वीची पूर्वलक्षी आकारणी असल्यास त्याचे थकबाकीसह चालू आर्थिक वर्षाचे येणे रक्कमेसह मालमत्ता कराची बिले दिली जातात. अशा बिलांची संपूर्ण रक्कम भरणेकरिता अनुसूची ड प्रकरण ८ कलम ४१ मधील तरतुदीनुसार बिल मिळाल्यापासून ३ महिने बिल भरणेची मुदत असते व असे नागरिक बिलाची रक्कम भरतात, मात्र त्यांना वरील नमूद तसेच मनपा धोरणानुसार ३० जुन पूर्वी पात्र ठरणा-या इतर सामान्य करातील सवलतीचा लाभ मिळत नाही. तथापि संदर्भ क्र.४ चे मंजूर ठरावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश निर्गत करण्यात येत आहेत.

कृपया मागे पहा...

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४०अ नुसार चालू आर्थिक वर्षात नवीन ज्या मालमत्तांवर प्रथम आकारणी कार्यवाही होऊन अशा मालमत्तांना प्रथम बिल देणेत आल्यास सदरचे मालमत्तांना चालू आर्थिक वर्षाचे ज्या दिनांकास बिल संगणक प्रणालीमधून निर्गत होईल त्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत किंवा ३१ मार्च यापैकी जे अगोदर घडेल त्या दिनांकास मागणी बिलानुसार आगाऊ मालमत्ता कर भरणा-या मालमत्ताधारकांकरिता थकबाकीसह चालू आर्थिक वर्षाचे दोन्ही सहामाहीसह संपूर्ण रक्कम एक रकमी भरणा केल्यास अशा मालमत्तेस खालीलप्रमाणे चालू आर्थिक वर्षाचे मागणीतील सामान्य करात सवलत देय राहिल.

| आगाऊ मालमत्ता कर भरणारे मालमत्ताधारक | चालू आर्थिक वर्षाचे मागणीतील सामान्य करात सवलत | |
|---|---|---|
| | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ पासून |
| स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मालमत्तेस | १०% | ५% |
| बिगरनिवासी / मिश्र/ औद्योगिक / मोकळया जमिनी इत्यादी मालमत्तेस | ५% | ५% |

तसेच महापालिका धोरणानुसार अशा नवीन आकारणी होणा-या मालमत्ता दिनांक ३० जून पूर्वी पात्र ठरणा-या उर्वरीत सवलतीसाठी पात्र ठरत असल्यास अशा मालमत्तांना मनपा धोरणानुसार निश्चित केलेल्या उर्वरित सदर सवलतीचा लाभ चालू आर्थिक वर्षामध्ये देय राहिल. सदर परिपत्रकाची अंमलबजावणी सदर परिपत्रकाचे तारखे पासून करणेत यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी पुणे-४११०१८

प्रति – सर्व करसंकलन विभागीय कार्यालय

प्रत - १. सर्व विभाग

२. माहिती व जनसंपर्क विभाग – सदर आदेशास व्यापक प्रसिद्धी देणेत यावी.

३. माहिती व तंत्रज्ञान विभाग / TECH – 9

२/- परिपत्रकामध्ये नमूद केलेनुसार संगणक आज्ञावलीमध्ये योग्य ते बदल करावेत.